# १२. कौस्तुभ चा पोवाडा

नारतो थाप डफावरी। तुणतुणी शिरी फेटा भरजरी। स्फूर्ति-देवता मनी स्मरणार॥ प्रतिभा कवनरूप घेणार। पुणे नगर उच्च नभी ललकार॥

शाहीर ऐसे नेटका। गातो घडघडा। नवा पोवाडा। रसिक मंडळी जमा झाली॥ म्हणती ओठ्यांची कळी खुलली। प्रशंसा-गंध सभोताली॥

त्या प्रशंसेचा जो धनी। त्याचा जयध्वनि। घुमतसे गगनी। 'कौस्तुभ' नांव त्याचे जाणा॥ मंडळी या इकडे काना। ऐका त्याचे कवन लावुन ध्याना॥

(चाल)

नामजोशी प्रसिद्ध घराणं। देई विद्या-वारसा दान॥
पितामह भोळे सानाचे। शासनांत स्थान मानाचे॥
मातामह, मातामही जाणा। कौस्तुभास विद्येचा पान्हा॥

(चाल) विज्ञानाचे उपासक 'विनोद' पिताजी थोर॥
निरलस संशोधन-वृत्ति-पाठ देणार॥
माय 'ललिता' मुलांवर करी थोर संस्कार॥
'कौस्तुभ-कौमुदी' गुणी मुलं बनणार॥
राष्ट्राचे धन संस्कारी मुलं ठरणार॥

(चाल) वातावरण निकोप घरदारी। खेळण्यावरी। दोघे परोपरी।
करा ध्यान लक्ष नित्य देत॥ एकाच एक धरून मनी हेत।
मुलांचे मानस हे शेत। गुणांचे पीक डुले तेथ॥
राहुनी प्रयत्नांपाठी। फळे गोमटी। देत जगजेठी।
'ललिता' अन् 'विनोद' अनुभवती॥ दिसदिस पुत्रांची प्रगति।

पाहून ये आनंदाला भरती ॥

(चाल)

इवू इवू बाळाच्या दिसू लागती लीला ॥
स्कॉलरशिप परीक्षांमध्ये बाळ अव्वल ठरला ॥
वर्गात वस्चा नंबर नाही सोडला ॥
नेहमी विविध विषयांत चमकू लागला ॥
दिसं दिस चहूकडे त्याच्या कौतुकाला ॥
पुत्राचे यश सुखविते माय-पित्यांला ॥

(चाल)

शालेय परीक्षा देतां । प्रतिकूल परिस्थिति झाली ॥
तापाने फणफणे पुरता ! परि हिंमत नच सोडियली ॥
दैवाने हात दाखवितां । गुणवत्ता-यादी चुकली ! ॥

(चाल)

विशेष-श्रेणी गुण मिळवुनि यां एस.एस.सी झालाऽऽ।
विज्ञानाच्या अभ्यासाची ओढ बहुत त्याला ॥ हां जी ॥
गणितामध्यें पराकोटीची रुची कौस्तुभाला ऽऽ।
अगणित गणितीं चमक दाविण्या ऊर्मी अंतराला ॥ हां जी ॥
चषक यशाचा एस.एस.सी.ला दैवें हुकालेला ऽऽ।
दुर्दैवाच्या चपराने यां खिन्न अंतराला ॥ हां जी ॥
भरपाई चौपट करण्यासी हुकल्या सुयशाचीऽऽ।
'राष्ट्रीय ऑलिंपियाड स्पर्धा' संधी मिळे साची ॥ हां जी ॥

(चाल) स्पर्धेसाठी निवडक लोकांची । निवड हो साची । त्यात
कौस्तुभची । मूळचीच दिसून येई चमक ॥ बुद्धिची
दिपविणारी चमक । ठरे सुयशाचें श्रेष्ठ गमक ॥

(चाल)

वंदुनी मायभूमीला ।
माय-पिता-गुरु-चरणांला
छात्रांच्या चमू राष्ट्रीयाला
विमानाने पडा चालला
पालकांनो शुभाशिष देण्याला ।
"औक्षवंत बाळांनो ओकून या सुयशाला ॥
आम्ही लावुन राहतो डोळे तुमच्या वाटेला ॥
सुयशाचा माळ घाला मातृभूमि-कंठाला ॥"

(चाल) राष्ट्रीयांत विमान पोहोचले । छात्र ते भारले । सिद्ध जाहले । ध्यायी भाग गणित स्पर्धेत ॥ आकाश थोरांचे फळा येत । यश: श्री: त्यांच्यामागून येत । सोनपावलांनी भारतांत ॥

(गद्य) १ सौम्यपदक आणि ५ कांस्यपदके आपल्या भारतीय विद्यार्थ्यांनी पटकावली ! बोला - भारतपुत्रांना विजय असो ! 'भारत माता की जय !'

(चाल) गौरवाचा थोर मानकरी । कौस्तुभ (धन्य) खरोखरी । मिरवी छातीवरी । विनयवृत्तीने सौम्यपदक ॥ लावुनी भाळी मंगल-तिलक । अवघ्राण करी (करतपी) जनानि-जनक ॥

कौस्तुभच्या यशाने नटला । अर्धांगाही खुलला । शाहिराचा गळा । प्रतिभावेलीला बहर आला ॥ रसिक हो कवन सुगंधाला । डोलवी मान पवाड्याला । 'वसन्तराय' धन्यतेत न्हाला ॥

—x—

मुंबई,
रचना २२ जुलै १९९२. (मुंबई-बदलापूर लोकल गाडीच्या प्रवासांत सुचलेलें शीघ्रकवन)